## प्रकरण ६ वे

# उपसंहार

# प्रकरण ६ वे

## उपसंहार

### समाज सेवक शामराव गुरुजी :

शामराव गुरुजींच्या संपूर्ण समाज सेवेतून त्यांच्या निस्वार्थी सेवेचे दर्शन घडते. त्यांनी समाजासाठी आपले जीवन वेचले. त्यांच्या या सेवेत फकिरीपणा होता. त्यांची दृष्टी सतत आशावादी होती. कार्यात धडाडी होती, दांडगा आत्मविश्वास होता. त्यांच्यापाशी पैसा बेताचा, शिक्षण बेताचे पदवी तर नाहीच त्यांचे शिक्षण जरी बेताचे असले तरी त्यांचे वाचन दांडगे व विस्तृत होते. दुर्दम्य आशावादातून ते कर्तृत्ववान बनले. त्यांनी केलेली सामाजिक चळवळ ही तनमनधन अर्पण करुन स्वार्थ त्याग पूर्वक केलेली होती. तत्कालीन समाज जागृती करीता सभा, पोवाडे, जलसे, उत्सव या सारखे समाजोपयोगी कार्यक्रम त्यांनी राबविले. हे कार्य ते एकनिष्ठेने करत राहिले अभिमानाला बळी पडले नाहीत. ते गरीबीत जन्मले, गरीबीत वाढले आणि गरीबीतच मरण पावले पण स्वार्थासाठी कधी तत्व बदललेले नाही. थोडक्यात त्यांचे जीवन म्हणजे खडतर तपश्चर्याच होती. त्यांची राहाणी अगदी साधी, स्वभावाने सहनशिल, कणखर आणि सतत ध्येयनिष्ठ असे हे सोज्वळ व्यक्तीदर्शन होते. त्यांचे कार्य म्हणजे एक निर्मळ " भक्तीसेवा" होती. [१]

बहुजन समाजाचे आजचे स्थान त्यास सहजासहजी प्राप्त झालेले नाही त्याकरीता महात्मा जोतिराव फुले, कर्मवीर शिंदे, राजर्षी शाहू छत्रपती या सारख्या महर्षींनी समाज प्रबोधनाच्या क्रांतीकारक चळवळी उभारुन बहुजन समाजाच्या पायात पडलेल्या आर्थिक, धार्मिक व सामाजिक गुलामगिरीच्या अवजड बेडया तोडून काढल्या व त्या

समाजापुढे सत्यशोधक समाजाची तत्वे ठेवली. हे कार्य करण्याकरीता नवसमाज निर्मितीच्या शपथा घेऊन ते कार्यरत झाले होते. त्यांच्या कार्यात श्रध्दा आणि जीवन निष्ठा होती. आपले जीवन हे समर्पित जीवन आहे ही त्यांच्या कार्यापाठीमागे उत्कृष्ठ आणि उदात्त भावना होती. [२]

महात्मा जोतिराव फुले ज्ञानपीठातून वैचारिक प्रेरणा घेतलेला व राजर्षी शाहू नृपतीच्या कार्याने संस्कारित झालेला जो एक नवा सत्यशोधक समाज महाराष्ट्राच्या क्षितीजावर उभा ठाकला होता त्याचे प्रतिनिधित्व गुरुवर्य शामराव देसाई आणि त्यांचे साथीदार यांनी केले होते. त्यांनी आपले चारित्र्य निर्मळ राखून आपल्या नीतिने एक सामाजिक मानदंडही निर्माण केला होता. [३]

या समाज सुधारकानी आपल्यापुढे समाज सुधारणेचे ध्येय ठेवले असल्याने रस्ते, वाहतुकीची सोय, गैरसोय, डोंगर, पायीप्रवास, श्वापदाची भीति, अन्नपाणी, थंडीवारा, ऊन पाऊस, वेळअवेळ, सणवार यांची पर्वा न करता आपले सेवाव्रत अखंडपणे चालू ठेवले होते. आज समाजात जी जागृती दिसते त्याचे श्रेय या समाजसुधारक महर्षींनाच आहे. [४]

## गुरुवर्य शामराव देसाई यांच्या कार्याचे सघदर्शन :

परदु:ख निवारण, अथवा समाज कल्याण हे गुरुजींच्या एकंदर कार्याचे ध्येय असल्याने त्यानी सुरु केलेले कार्य आजही बेळगांव भागातील परिसरांत अविरत चालू आहे.

सामाजिक, धार्मिक चळवळी करीता ज्या अनेक संघशक्ती शामराव गुरुजींनी उभ्या केल्या होत्या त्यापैकी " मराठा संघ, शहापूर " [१९३१] ही एक संस्था होय. या संस्थेने आजही गुरुजींचे कार्य चालू ठेवले आहे.

LIBRARY KOLHAPUR

लोकांना बचतीची सवय लागावी व त्यांचे आर्थिक दैन्य नाहीसे व्हावे या उद्देशाने गुरुजींनी गल्लो गल्ली फंड, व गावोगांवी सहकारी सोसायट्या सुरु केल्या होत्या. याचा जनमनांवर चांगलाच परिणाम होऊन ते फंडस् व सोसायट्या आज आदर्श रुपाने प्रतिष्ठीत आल्या आहेत.

गुरुजींच्या प्रेरणेने १९६६ मध्ये बेळगांवमध्ये " मराठा युवक संघ " स्थापन झाला. हा संघ समाजसेवा, राष्ट्रप्रेम, शिस्त, स्वावलंबन, बंधुत्व या तत्वांचे पालन करतो आहे.

गांवातील तंटे बखेडे गावक-यांच्या मार्फत सुटावेत. पंच मंडळींच्या वचकामुळे लोक व्यसन मुक्त व्हावेत गांवात गांवक-यामार्फत सुधारणा कराव्यांत या उद्देशाने शहरात गुरुजींनी प्रत्येक गांवात तर कांही ठिकाणी गल्ली गल्लीमध्ये पंच मंडळींची निवड केली होती. आजही या पंचमंडळींचे कार्य चालू आहे. त्यामुळे अडाणी शेतकरी कोर्टकचे-या, तंटे, मारामारी यापासून अलिप्त आहेत. यापैकी होसूर, शहापूर येथील पंच मंडळीने तर पांच लाखाचे " मराठा मंगल कार्यालय " बांधले असून या उत्पनांतून गरीब विद्यार्थ्यांना ही मंडळी कपडे, पुस्तके, वह्या पुरवित असतात.

गुरुजींच्या शैक्षणिक प्रसारातून निर्माण झालेल्या संस्था आज एकनिष्ठेने बेळगांव भागांत शैक्षणिक कार्य करत आहेत. त्यापैकी १] मराठा मंडळ, बेळगांव [ १९३७ ], २] बेळगांव जिल्हा शेतकरी शिक्षण समिति [ १९४१ ], ३] विश्वभारत सेवा समिती [ १९[illegible]७ ], ४] दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ [ १९६५ ], ५] रंगूबाई भोसले मराठा ट्रस्ट [ १९३८ ], ६] जत्तीमठ देवस्थान ट्रस्ट, बेळगांव [ १९[illegible]४ ] इ. चे कार्य कौतुकास्पद आहे. [५]

आपला समाज हा कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला आहे. सावकाराचे पाश त्याच्या गळ्यात अडकले आहेत. हे गुरूजींनी पाहिले. यातून मार्ग काढण्याकरीता व लोकांना काटकसरीची सवय लावण्या-करीता शामराव गुरूजींनी सर्व प्रथम " पैसा फंड " योजना सुरू केली सहकारी सोसायटीची सुरवात केली, याचा झालेला चांगला परिणाम पाहून व व्यापारी आणि उद्योग धंदेवाल्या करीता आर्थिक सहाय्य करण्यासाठी शहापूर येथे सन १९३६ ला श्री तुकाराम महाराज मराठा परस्पर सहाय्यकारी मंडळची स्थापना केली. पुढे १९५२ मध्ये याच मंडळाचे रूपांतर श्री तुकाराम अर्बन को-ऑप. क्रेडिट बँक लि., शहापूर असे झाले. त्यानंतर १९४२ ला दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लिमिटेडची स्थापना झाली. आज या बँकानी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना सहाय्य करून सबल बनविले आहे. तर व्यापार उद्योग धंदे शैक्षणिक संस्था यांना सहाय्य करून त्यांच्या कार्याला चालना दिली आहे. शामराव गुरूजींनी सुरू केलेल्या कार्याचे हे ख-या अर्थाने सार्थक आहे.

सराफी धंदात त्याच बरोबर कारखानदारीत मराठा समाजाने पुढे यावे या उद्देशाने कै. गुरूवर्य शामराव देसाई यांनी " शहापूर सुवर्ण रौप्य औद्योगिक सहकारी संघ लि. ची १९४८ ला स्थापना केली. या संस्थेचे कार्य आजही चालू आहे.

याच संस्थेच्या वतीने चंदगड येथे " जयहिंद " गिरणी चालविली जात आहे. या शिवाय कांही लेथस् भाड्याने दिलेल्या आहेत.

आज बेळगांव भागांतील ७० ते ७५ टक्के मुद्रण व्यवसाय बहुजन समाजाच्या हाती आहे. गुरूजींनी चालविलेल्या " राष्ट्रवीर " वृत्तपत्रापासून प्रेरणा घेऊन बहुजन समाजातील खालील व्यक्तींनी वृत्तपत्रीय व्यवसाय सुरू केला आहे.

तक्ता क्र. ९.

बेळगांवमधील विविध पत्रके, स्थापना व संस्थापक दर्शक तक्ता.

| पत्रक | स्थापना | संस्थापक |
|---|---|---|
| चिकित्सक | १८८५ | रावसाहेब आबाजी. रामचंद्र सावंत. |
| राष्ट्रवीर | १९२१ | शामराव भोसले. |
| आघाडी | १९३८ | डी. एस. जाधव. |
| नवजीवन | १९५४ | रामचंद्र लिंगोजी टोपाजीचे |
| लोकमत | १९५३ | वामनराव सावंत. |
| विशाल महाराष्ट्र | १९६६ | व्ही. के. चव्हाण-पाटील . |
| सत्यवादी | १९६९ | कृष्णा मेणसे. |

ही वृत्तपत्रे आजही समाज परिवर्तनाचे कार्य करत आहेत. [६]

गुरूवर्य शामराव देसाई यांनी मांडलेल्या ब्राम्हण विरोधी विचारांवरून ते ब्राम्हणव्देष्टे होते असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. गुरूजींचा विरोध समाजविघातक अशा ब्राम्हणी आचार आणि विचारांना होता. वैयक्तिक पातळीवर त्यांनी कधीही ब्राम्हणांचा व्देष केला नाही. किंबहुना ब-याच पात्र व चांगल्या आचार विचारांच्या ब्राम्हण व्यक्तींना नोक-या व अधिकाराच्या जागा दिल्याचे दिसून येते. त्यांच्या या धोरणामुळे त्यांची मनोवृत्ती किती संतुलित होती याचे स्पष्ट दिग्दर्शन होते.

कै. गुरूवर्य शामराव देसाई यांच्या कार्याच्या परिणामाने आज बहुजन समाजातील लोक विविध व्यवसायात उतरले आहेत. प्रत्येक धंद्यात बहुजन समाज पुढे आलेला आपणाला आढळतो आहे. खालील व्यवसाय व टक्केवारीवरून त्यांची आपल्याला स्पष्ट कल्पना येईल.

तक्ता क्र. १०.
बेळगांवमधिल विविध व्यवसायातील बहुजन समाजाची टक्केवारी दाखविणारा तक्ता.

| व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|
| बेकरी | ८० ते ८५ |
| दुग्ध व्यवसाय | ८० |
| जळाऊ लाकूड व्यवसाय | ९० |
| फर्निचर मेकिंग | ९० |
| फोटोग्राफी | ९० |
| चांदीकाम | ९० |
| किराणामाल दुकाने | ६० |
| सुतार गवंडी | ९५ |
| मोटार बॉडी बिल्डिंग | १०० |
| मोटार रिपेअरींग | ७० |
| टिंबर मर्चंट | ७० |
| बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरर्स | ७० |

वरील टक्केवारी वरून असे स्पष्ट आढळून येते कीं, माणसाच्या दैनंदिन गरजाशी संबंधीत अशा सर्व व्यवसायात बहुजन समाज आघाडीवर आहे. याशिवाय कांच व्यवसाय, शितपेयगृह, हॉटेल्स, इंजिनिअरींग, भाजीपाला, फळफळावर, साडी सेंटर्स, हार्डवेअर, भांड्याची दुकाने, सिनेमा थिअटर्स, अडतदुकानदार, डॉक्टर्स, वहाने या प्रत्येक क्षेत्रात आज बहुजन समाज अग्रेसर असलेला आपल्याला दिसून येतो.[८]

शामराव देसाई यांचे कार्य आणि आजचा बेळगांव परिसरातील समाज :

आजपर्यंत बेळगांव परिसरातील बहुजन समाजाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, व्यवसाईक, धार्मिक क्षेत्रात

केलेल्या कार्यावरुन सर्व सामान्य माणसांची अशी समजूत होईल की, इथला बहुजन समाज मानवी जीवनाची सर्व प्रमुख क्षेत्रे व्यापून राहिला आहे.तो प्रगतीच्या शिखरावर जाऊन पोहचला आहे. परंतु त्याचे येथील वास्तव जीवन न्याहाळल्यास ही समजूत खोटी ठरण्याची शक्यता आहे.[८] कारण आजही येथे अंधश्रध्दा, अनिष्ठरुढी यांचे पूर्णत: निर्मूलन झालेले नाही. गुरुजींनी बहुजनसमाजाला पटवून देऊन कांही गावातील लक्ष्मीची यात्रा बंद केली होती. पण गुरुजींच्या मृत्यूनंतर पुन्हा या जत्रा ठिकठिकाणी सुरु होत आहेत. समाजावर धर्म भोळेपणाचा पगडा परत स्पष्टपणे दिसून येत आहे. सर्वच धर्मातील विषमता वाढत आहे. दरिद्री जनता दरिद्रीच आहे. इनामदार, सावकार, उच्चवर्णीय सामान्यांची पिळवणूक करत आहेत. जे कांही कायदे झालेले आहेत तेही भांडवलदार, कारखानदार, मोठे जमिनदार, वरिष्ठ, उच्चवर्णीय यांना संरक्षण देणारेच आहेत. गरीब, मागासलेले, शुद्र, अतिशुद्र यांना कसलेच संरक्षण नाही.[९]

आज विधायक कार्यासाठी ज्या संघटना उभ्या आहेत. त्या सरकारी मदत व भांडवल मिळविणा-या संस्था बनल्या आहेत. त्यांचे लक्ष हितापेक्षा सत्तेकडेच जास्त आहे. यामुळे मागास वर्गीय व दुर्बल घटकांना लाचारीचे जीवन घालवावे लागत आहे. याला केवळ धर्म, सावकार, श्रीमंत, वरिष्ठच जबाबदार नसून मुख्यत्वे शासन जबाबदार आहे.[१०]

आजच्या भारतीय समाजासमोर महत्वाचे असे आर्थिक, सामाजिक, धार्मिक प्रश्न आहेत. गरीबांचे प्रश्न सोडविण्यासाठी ब्राम्हणेतर चळवळीने सहकारी चळवळीचा अवलंब केला. ही चळवळ जास्त निरोगी आणि प्रभावी करणे, आजच्या संदर्भात महत्वाचे आहे. भारतीय ग्रामीण समाजातील गरीबीबद्दल गुरुवर्य शामराव देसाई यांनी

मूलभूत विचार मांडले व त्यावर आधारीत अशा योजना राबविल्या. आजच्या संदर्भात गरीबांच्या प्रश्नांना सामोरे जाऊन ते सोडविण्याकरीता जिद्दीने आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करणे, आवश्यक आहे. ब्राम्हणेतर चळवळीने केलेले या संदर्भातील कार्य आजच्या समाजाला आदर्शभूत ठरू शकते.

धार्मिक संकल्पनांचा प्रभाव वाढत गेल्यास समाजाचे विघटन होवू शकते, हा अनुभव आज सर्वांनाच येत आहे. यामुळे एक प्रकारचा धार्मिक दहशतवाद वाढत आहे. देशातील परिस्थिती स्फोटक आणि विघातक होत चालली आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी सत्यशोधक विचारांवर आधारलेली निधर्मी समाजरचना प्रस्थापित करण्याची आजची गरज स्पष्ट होते. या दृष्टीने गुरुवर्य शामराव देसाई यांच्या विचाराचे व कार्याचे आजही महत्त्व आहे.